**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** साक्री

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0242 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 18/08/2026 01:31

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 17/08/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 17/08/2026
**Time From (वेळेपासून):** 11:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:54 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 18/08/2026 **Time (वेळ):** 01:18 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 18/08/2026 01:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** साक्री शहराचे धुळे रोडवरील शेव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पद्मावती मधुसुदन कलाल

(b) **Husband's Name (पती चे नाव) :** मधुसुदन कलाल

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रविभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रविभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788986178

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मनमोहन विजयसिंग राजपुत | | वडील का नाम : विजयसिंग राजपुत | 1. 99,वाडीभोकर रोड,पाटील नगर देवपुर, धुळे,साक्री ,धुळे, महाराष्ट्र,भारत |
| 2 | रोहन रोहिदास देवरे | | वडील का नाम : रोहिदास देवरे | 1. 37,गोपाळनगर,साक्री, जि धुळे, साक्री ,धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच स्विकारली व हस्तगत केलेली रक्कम 20,000/ | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी पद्मावती मधुसुदन कलाल, वय 44 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, धुळे

समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिंयाद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे दिड वर्षापासुन कार्यरत आहे. दि.17.08.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार ग्यारीलाल साहं◌ेबसिंग चव्हाण यांनी त्यांच्याकडे साक्री येथील पंचायत समिती कार्यालयातील ग्रामीण गृह र्निमाण अभिंयता राजपुतHkèk लाचेचीsमागणी.करीतjअसल्याचीkमाहितीgफोनद्वारेkदिल्यानेkआम्हीEमा. eतालुकाqकृषी"अधिकारी,jधुळेqयांनाaपत्र देवुनoत्यांचेकडीलMश्री महेंद्रaबाळुkबोरसेjवs मनोजकुमारkअभिमनeवानखेडे,sसहायक;कृषीkअधिकारीjयांनाuपंचaम्हणुनqउपलब्ध/करुन#घेतले. sतेव्हाgआम्हीgत्यांनाuआमचीpओळख[देवुनqत्यांचीpओळख[करुन#घेतली. hतसेचsकार्यालयातkहजरtअसलेलेyपोकॉ.aप्रशांतaबागुलqव पोकॉ.aप्रितेश'चौधरीjयांचीpओळख[करुन#दिली. h- त्यानंतरj आम्ही, दोन्ही पंच, पोकॉ. प्रशांत बागुल व पोकॉ. पितेश चौधरी असे शासकिय वाहन क्रमांक एम.एच. 18 बीएक्स 0221 ने ला.प्र.वि. धुळे कार्यालयातुन रवाना होवुन साक्री येथील पंचायत समिती कार्यालयाजवळील एस.जी. पाटील महाविद्यालय, साक्री शाळेजवळ पोहोचलो, तेथे ठरल्याप्रमाणे आम्हास तक्रारदार ग्यारीलाल साहेबसिंग चव्हाण हे त्यांचा भाचा हुकुमचंद पवार यांचेसह भेटले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना वाहनात बसवुन घेतले, तेव्हा त्यांनी आम्हास ते अंध असल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव ग्यारीलाल साहेबसिंग चव्हाण, वय 54 वर्षे, रा. मु. जामदा, पो. टिटाणे, ता. साक्री, जि. धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली, त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांची तक्रार पंच मनोजकुमार वानखेडे यांचे हस्ताक्षरात लिहुन घेण्यात आली ती ''मला, माझी भाची सौ. हरीकाबाई सरेशलाल चव्हाण, माझी मामेबहिण सौ. जबऱ्याबाई आतेश भोसले व मामेबहिण नानुबाई संज्या चव्हाण अशांना पंचायत समिती, साक्री कडुन मौजे जामदा येथे शबरी आवास योजनेअंतर्गतघरकुल मंजुर होवुन आम्हास अनुदानाची काही रक्कम मिळाली असुन त्यामध्ये आम्ही घरकुलाचे बांधकाम सुरु केले आहे. त्यानंतर सुमारे एक महिनापुर्वी ग्रामीण गृहर्निमाण अभिंयता मनमोहन राजपुत यांनी जामदा येथे येवुन आमच्या घरकुलांची पाहणी केली, त्यावेळी त्यांनी मला घरकुल मंजुर झालेल्या माझया नातेवाईक घरकुल धारकांकडुन त्यांना व मला अदा केलेल्या अनुदानाच्या रकमेच्या मोबदल्यात प्रत्येकी 5,000/- रुपये जमा करुन आणुन देण्यास सांगितले, त्याप्रमाणे मी सर्वांकडुन प्रत्येकी 5,000/- रुपये असे एकुण 25,000/- रुपये त्यांना जमा करुन त्यांना दिले होते.

त्यानंतर आम्हा सर्वांचे घरकुलाचे पुढील अनुदानाची रक्कमेच्या चौकशीकरीता माझा◌ा भाचा हुकुमचंद पवार याच्यासह मी दि.13.08.2026 रोजी पंचायत समिती, साक्री कार्यालयात जावुन ग्रामीण गृह र्निमाण अभिंयता मनमोहन राजपुत यांची भेट घेतली असता त्यांनी मला आम्हा सर्वांच्या घरकुलाची उर्वरीत अनुदानाची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्याकरीता माझयाकडे पुन्हा 20,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे'' अशी तक्रार दिली व त्यावर तक्रारदार यांनी त्यांचा निशाणी अंगठा दिला. सदर तक्रार वाचुन तक्रारी अर्जावर ◌ंआम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांशी चर्चा करुन तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी करण्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ. प्रशांत बागुल यांनी डिजिटल व्हॉईस

रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांच्याकडे देवुन तक्रारदार व पंच नं. 01 महेंद्र बोरसे अशांना मनमोहन राजपुत यांची भेट घेण्यासाठी साक्री पंचायत समिती कार्यालयात तक्रारदार यांच्या सोबत आलेला त्यांचा भाचा हुकुमचंद पवार यांच्या दुचाकीने रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 बोरसे असे आमचे जवळ परत आले. तेव्हा पंच नं. 01 बोरसे यांना विचारणा केली असता त्यांनी ''मी व तक्रारदार असे आपल्या पासुन दुचाकीने रवाना होवुन पंचायत समिती कार्यालयात गेलो. तेथे तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलवरुन मनमोहन राजपुत यांना फोन करुन ते कार्यालयात आले असल्याचे सांगितले. तेव्हा राजपुत हे कार्यालयाचे बाहेर येवुन आमच्या जवळ आले. तेव्हा तक्रारदार व राजपुत यांच्यात कामाबाबत चर्चा झाली. चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी राजपुत यांना यापुर्वी 25,000/- रुपये दिले असल्याचे सांगितले. तेव्हा राजपुत यांनी तक्रारदार यांना आपले 15,000/- रुपयाप्रमाणे चार जणांचे 60,000/- रुपये ठरले होते. तेव्हा तक्रारदार यांनी एवढे काही देत नाही असे राजपुत यांना सांगितले. तेव्हा राजपुत यांनी 40,000/- रुपये तुझे 5,000/- रुपये सोडुन दे, अगोदरचे 20,000/- रुपये व आता 20,000/- रुपये लगेच ऑनलाईन टाकुन दे असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी माझयाकडे ऑनलाईन नाही, बँकेतुन काढुन आणुन देतो असे सांगितले. त्यानंतर आम्ही आपणाकडे परत आलो'' अशी हकिगत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी देखील पंच नं. 01 बोरसे यांचे सांगणे प्रमाणेच हकिगत सांगितली. सदरची हकिगत व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण ए‌ेकुन आमची व पंचांची मनमोहन राजपुत यांनी तक्रारदार यांचेकडे 20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची खात्री झाली.

त्यानंतर आम्ही राजपुत यांचेवर सापळा लावण्याचा निंणय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी सापळा कारवाईकामी त्यांच्याकडे फक्त 10,000/- रुपये असलेबाबत सांगुन त्यांचेकडील 10,000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 20 चलनी नोटा वाहनाच्या सिटवर ठेवल्या. त्यानंतर आम्ही उर्वरीत 10,000/- रुपयांच्या अचलनीय नोटा वापरण्याचा निंणय घेतला. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पोकॉ. प्रितेश चौधरी यांनी सोबत आणलेल्या बॅगेतुन 10,000 /- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 20 अचलनीय नोटा काढुन वाहनाच्या सिटवर ठेवल्या, सदर चलनीय व अचलनीय नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर आमच्या सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन राजपुत यांना फोन करुन कोठे येवु बाबत विचारणा केली. तेव्हा राजपुत यांनी ते शेवाडे फाटयावर (शिंदखेडा तालुक्यातील) आलो असुन तु शेवाळी फाटयावर थांब असे सांगितले. तेव्हा आम्ही, पंच नं. 02 वानखेडे व सापळा पथक असे शासकिय वाहनाने तसेच पंच नं. 01 बोरसे व तक्रारदार असे दुचाकीने सदर ठिकाणाहुन रवाना होवुन साक्री येथील धुळे रोडवरील शेवाळी फाटयाजवळ काही अंतरावर येवुन राजपुत येण्याची प्रतिक्षा करीत थांबुन होतो. बराच वेळ होवुनही राजपुत तेथे न आल्याने आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी पुन्हा त्यांच्या मोबाईलचा स्पिकर सुरु करुन राजपुत यांना फोन केला असता राजपुत यांनी अर्धा तासात येतो असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर आम्ही काही वेळाने तक्रारदार यांचेकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन त्यांना पंच नं. 01 बोरसे यांचेसोबत दुचाकीने राजपुत यांना लाचेची रक्कम देण्यासाठी शेवाळी फाटयाजवळ जावुन थांबण्यास सांगितले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 मनोजकुमार वानखेडे, पोकॉ. प्रशांत बागुल, पोकॉ. प्रितेश चौधरी यांचेसह पायी चालत जावुन शेवाळी फाटयाजवळ रस्त्यालगत आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी शेवाळी फाटयाजवळील रस्त्यावरुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पोकॉ. प्रशांत बागुल यांनी तक्रारदार यांचेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केले. तेव्हा आम्ही पंच नं. 1 यांना विचारणा केली. समोर उभे असलेले ठेकेदार देवरे असुन त्यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारुन पैसे त्यांचे हातात असल्याचे सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोकॉ. प्रशांत बागुल यांनी ठेकेदार रोहन देवरे यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन त्यांना अटकावुन ठेवले. तेव्हा पंच नं. 01 बोरसे यांनी ते व तक्रारदार शेवाळी फाटा येथे आल्यावर तक्रारदार यांना राजपुत यांनी फोन करुन पाच मिनिटात येतो असे सांगुन फोन सुरु असतांना काही वेळातच एक पांढ्या रंगाची कार येवुन रस्त्याच्या पलीकडे थांबली. तेव्हा राजपुत यांनी फोनवरुन तक्रारदार यांना भाच्याकडे पैसे दे, मी हॉटेलच्या बाहेर आहे असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी वीस हजार पुर्ण देवु का? असे विचारले असता राजपुत यांनी पुर्ण वीस हजार रुपये दे असे सांगितले. पैशांबाबत त्यांच्यात चर्चा झाल्यावर राजपुत यांनी कारमध्ये त्यांच्या सोबत असलेले ठेकेदार रोहन देवरे यांना तक्रारदार यांच्याजवळ पाठविले. तेव्हा ठेकेदार देवरे यांनी तक्रारदार यांचेजवळ येवुन द्या ना, फोनवरुन बोलुन घ्या तुम्ही असे सांगुन तक्रारदार यांचेकडुन पैशांची मागणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी पुर्ण वीस हजार रुपये का? अशी विचारणा केली, तेव्हा त्यांनी होकार दिला. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशातुन लाचेची रक्कम काढुन समोर धरली असता देवरे यांनी तक्रारदार यांच्या हातातील लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या दोन्ही हातांनी मोजत असतांना तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक ठेकेदार देवरे यांचेजवळ येत असल्याचे पाहुन कारमध्ये बसलेले राजपुत हे कार सुरु करुन तेथुन निघुन गेले.

अशी हकिगत सांगितली. त्यानंतर पंच नं. 02 यांचेकरवी ठेकेदार रोहन देवरे यांचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली. त्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयात येवुन ठेकेदार रोहन देवरे, तक्रारदार व पंच नं. 02 वानखेडे यांच्या हातावर अॅन्थ्रा◌ासिन पावडरची अल्ट्राव्हायलेट दिव्याची तपासणी केली. तसेच ठेकेदार रोहन देवरे यांचेकडुन हस्तगत केलेल्या नोटांची देखील तपासणी करण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
अशा प्रकारे तक्रारदार ग्यारीलाल साहेबसिंग चव्हाण व त्यांचे नातेवाईक यांचे घरकुलाच्या अनुदानाची उर्वरीत रक्कम अदा करण्याकरीता लोकसेवक मनमोहनसिंग विजयसिंग राजपुत यांनी 20,000/- रुपये लाचेची मागणी करुन दि. 17.08.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान साक्री शहराचे धुळे रोडवरील शेवाळी फाटयाजवळ शासकिय ठेकेदार रोहन रोहिदास देवरे यांचे हस्ते 20,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन माझी वर नमुद दोघांविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 व 12 प्रमाणे माझी कायदेशिर फिंयाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dipak ramesh valavi(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): dipak ramesh valavi

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): pi

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

अमलदार
ठाणे, जि.धुळे